


**जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालय, वाशिम**

**वाशिम जिल्हया करिता वार्षिक गौण खनिज उद्दिष्ट प्राप्त होते.**

- **गौण खनिजा वसुली बाबत उद्दिष्ट पुर्ती करणे करिता खालील प्रमाणे कार्यवाही / कामे करण्यात येतात .**

**परवान्याचा प्रकार**

**1. खाणपट्टा (05 वर्षा करिता) मंजुर / नुतनीकरण करणे-**

आवश्यक कागदपत्रे-

अ) पर्यावरण विभाग मंत्रालय,मुंबई यांची परवानगी

ब) संचालक, खनिकर्म संचालनालय,भुविज्ञान आणि खनिकर्म संचनालय,नागपुर यांचा मान्यता प्राप्त खाणकाम आराखडा

क) संबधित विभागाची ना हरकत (वनविभाग/सा.बां./जि.प.बांध/आरोग्य/मोजणी/विद्युत/उ.वि.अ.महसुल)

ड) ग्राम पंचायत ठराव, अकृषक आदेश

ई) खाणपटया करिता अर्ज नमुना ख व नुतनीकरण करण्या करिता नमुना-ग मध्ये अर्ज



## 2. स्टोन क्रशर (प्रदुषण विभागाच्या मुदतीनुसार) मंजुर करणे-



**आवश्यक कागदपत्रे-**

अ) प्रदुषण नियंत्रण मंडळ अमरावती यांचे प्रमाणपत्र

ब) संबधित विभागाची ना हरकत (वन विभाग/सा.बां./जि.प.बांध/आरोग्य/मोजणी/विद्युत/उ.वि.अ.महसुल)

क) ग्राम पंचायत ठराव, अकृषक आदेश

## 3. तात्पुरता उत्खनन व वाहतुकी परवाना (खाजगी गटा करीता) मंजुर करणे-

1. तात्पुरते परवाने देण्याचे अधिकार
2. जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी-100000 ब्रास पर्यत
3. उपविभागीय अधिकारी-2000 ब्रास पर्यत
4. तहसिलदार- 500 ब्रास

**परवाना देण्या करिता आवश्यक कागदपत्रे-**

अ) सदर गट हा खाणकाम आराखडयात समाविष्ट आसवा.

ब) तहसिलदार/तलाठी यांचा अहवाल (7/12,8-अ,संबंधिताचे नाहरकत ई )

क) परवान्या करिता अर्ज नमुना - त मध्ये अर्ज

**4. व्यापारी परवाना (01 वर्ष ) मंजुर करणे -1 वर्षा करिता**

**परवाना देण्या करिता आवश्यक कागदपत्रे-**

अ) तहसिलदार यांची नाहकत

ब) अकृषक आदेश

क) परवान्या करिता  अर्ज नमुना - न व नुतनीकरण करिता नमुना -ध  मध्ये अर्ज



**5. रेतीघाट लिलाव करणे-**

1. जिल्हयातील प्रमुख नदी ही पैनगंगा असुन सदर नदी ही रिसोड व वाशिम तालुक्यात वहन करते.सबब रिसोड व वाशिम तालुक्यातुन लिलावा करिता घाट प्रस्तावित होतात.
2. रेती घाट लिलावा करिता जिल्हास्तर/तालुकास्तरावर समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत.
3. सदर समिती रेती घाट लिलाव करण्या करिता शिफारस करतात.
4. रेती घाट लिलाव करण्या करिता पर्यावरण विभागाची नाहरकत घेणे बंधनकारक आहे.
5. रेती घाट लिलाव करते वेळेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन जनसुनावणी घेण्यात येते.
6. रेती घाट हे ई -लिलाव करण्यात येतो.



**6. खाणपट्टा/क्रशर/तात्पुरता परवाना/व्यापारी परवाना / रेती वाहतुक करिता शौर्य टेक्नोस्वॉफ्ट कंपनी पुणे मार्फत बारकोड वाहतुक पासेस परविले जातात.**

**7. विविध विभागाकडुन प्राप्त होणारे स्वामित्वधन मोकळे करण्या बाबतचे प्रमाणपत्र देणे.**

**8. अवैध उत्खनन/दंडात्मक प्रकरणे/गौण खनिज संबंधित तक्रारी निकाली काढणे.**

**जिल्हा खनिज प्रतिष्ठाण,वाशिम अंतर्गत करावयाची कार्यवाही.**

1. सदर प्रतिष्ठानचे अध्यक्ष जिल्हयाचे मा.पालकमंत्री महोदय हे आहेत.
2. सदर प्रतिष्ठान करिता निधी हा स्वामित्वधनाच्या रक्कमेच्य 10 टक्के प्रमाणे जमा होतो.
3. सदर प्रतिष्ठान हे खाण बाधीत क्षेत्राच्या विकासा करिता गठीत करण्यात आलेले आहे.

**सदर प्रतिजष्ठान अंतर्गत खालील प्रमाणे दोन भाग करण्यात आलेले आहेत.**

1) **अ) उच्च प्राथम्य बाबीवर खर्च करावयाचे प्रस्ताव ( 60 टक्के प्रमाणे )** खालील बाबीचा समावेश आहे.

1) पिण्याचे पाणी पुरवठा 2) पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रण उपायोजना 3) आरोग्य 4) शिक्षण 5) महिला व बालकल्याण 6) वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तीचे कल्याण 7) कौशल्य विकास

2) **ब) अन्य प्राथम्य बाबीवर खर्च करावचे प्रस्ताव (40 टक्के प्रमाणे)** - खालील बाबीचा समावेश आहे.

1) भौतिक पायाभुत सुविधा 2) जलसंपदा 3) ऊर्जा व पाणलोट क्षेत्र विकास 4) खनिकर्म जिल्हयातील पर्यावरण दर्जा वाढ करण्या करिता अन्य योजनावर नमुद करण्यात आलेल्या बाबीवर सदर निधी हा खाणबाधीत क्षेत्रातील विकास करिता खर्च करण्यात येतो.





